# नगर पंचायत भिसी जि. चंद्रपूर

## मा. मुख्यमंत्री यांचा १०० दिवस कार्यक्रम

## सादरीकरण





सादरकर्ता:- मुख्याधिकारी नगर पंचायत भिसी

# १.संकेतस्थळ

## अ) वापरण्यातील सुलभता

नगर पंचायत भिसी संकेतस्थळ वापरण्यास सुलभ आहे.

https://bhisinp.in/



# आ) माहितीचे अद्यावतीकरण
# इ) माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहितीचे स्वयम प्रकटीकरण

- माहितीचे अद्यावातीकरण करण्यात आले आहे.
- माहिती अधिकार अधिनियमांतर्गत नगर पंचायत ची माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.



## ई) सुरक्षितता
## उ) लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत सेवा अधिसूचित करून ऑनलाईन प्रसिद्ध करने

- संकेतस्थळ च्या सुरक्षिततेबाबत जनजागृती करण्यात येत आहे.
- लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत सेवा अधिसूचित करून न. पं. संकेतस्थळावर ऑनलाईन प्रसिद्ध करण्यात आली आहे.



# २. सुकर जीवनमान

नागरी सेवांचे सुलभीकरण (किमान २ सेवा)
(पूर्वीच  स्थिती व सुलोभिकरना नंतर झालेले बदल यांची तुलना आवश्यक)

| अ. क्र. | सेवा | पूर्वीची स्थिती | सध्यस्थिती |
|---|---|---|---|
| १ | पाणीपुरवठा मदत कक्ष | पूर्वी मदत कक्ष नसल्यामुळे नागरिकांना पाणीपुरवठा संबंधित तक्रारी वेळेत निराकन करण्यास अडचण निर्माण होत होती. | पाणीपुरवठा संबंधित येणाऱ्या तक्रारी वेळेत निराकरण करण्याचे अनुषंगाने पाणीपुरवठा मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे. त्यामुळे तक्रारींचे निराकन वेळेत होतात. |
| २ | कर संकलनासाठी QR | कर संकलन करताना QR नसल्यामुळे नागरिकांना रोख नसल्यास कर भरणा करण्यास अडचण निर्माण होत होती. | QR उपलब्ध करून दिल्याने नागरिकांना कर भरणा करणे सोयीचे झाले आहे. त्यामुळे नगर पालिका कर संकलन टक्केवारीमध्ये वाढ झाली आहे. |

# ३. स्वच्छता

## अ) अभिलेख निंदनीकरण व वर्गीकरण

नगर पंचायत कार्यालयातील अभिलेख निंदनीकरण करण्यात आलेले असून ६ गठ्ठे पद्धती नुसार वर्गीकरण करण्यात आले आहे. सदर अभिलेख योग्य पद्धतीने जतन करण्याचे अनुषंगाने अद्यावत अभिलेख कक्ष तयार करण्यात आला .



## आ) मुदतबाह्य अभिलेख नष्ट करणे

कार्यवाही सुरु आहे.

## इ) जड वस्तू संग्रह नोंदवही अदययावतीकरण

अद्ययावत करण्यात आली आहे.

## ई) जुन्या व निरुपयोगी जड वस्तूंची विल्हेवाट

जुन्या वापरत न येणाऱ्या जुन्या वस्तूंची विल्हेवाट लावण्यात आली आहे.

## उ) जुन्या वाहनाचे निर्लेखन


नगर पंचायत भिसी ची स्थापना २६ नोव्हेंबर २०२१ रोजी झालेली असून नगर पंचायती कडे १५ वर्षापूर्वीचे जुने वाहन उपलब्ध नाही


# ४. तक्रार निवारण

अ) आपले सरकार पोर्टलवरील तक्रारीचे निराकरण (दिनाक १ जानेवारी २०२५ पूर्वीच्या तक्रारी निरंक करणे)

आ) पी जि पोर्टल वरील तक्रारीचे निराकरण ( दिनाक १ जानेवारी २०२५ पूर्वीच्या तक्रारी निरंक करणे)

आपले सरकार पोर्टल, पी.जि. पोर्टल वरील तक्रारींचे वेळेत निराकन करण्यात येते. एकही तक्रार प्रलंबित नाही. प्रलंबित तक्रारींची टक्केवारी ०%.



## इ) अभ्यागत भेटीचे नियोजन व भेटीच्या वेळेबाबत प्रसिद्धी

अभ्यागतांना मुख्याधिकारी यांना भेटण्याची वेळ सकाळी ११.०० वा ते दुपारी ४.३० वा पर्यंत निश्चित करण्यात आली आहे.



# ई) लोकशाही दिनाचे आयोजन व त्यामधील तक्रारीचे निराकरण

लोकशाही दिनानिमित्य नगर पंचायत क्षेत्राची पाहणी करून तात्काळ सोडवता येणाऱ्या समस्या तात्काळ सोडविण्यात आल्या तसेच न. पं. मार्फत देण्यात येणाऱ्या सेवा तात्काळ पुरविण्यात आल्या . उदा. जन्म-मृत्यु प्रमाणपत्र, कर आकारणी, कर संकलन व शौचालय फॉर्म नोंदणी इत्यादी.....

# ५. कार्यालयीन सोई सुविधा

## अ) कायमस्वरूपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

नगर पंचायत कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना व कर्मचारी यांना कायम स्वरुपी स्वच्छ पिण्याचे पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे



## आ ) कर्मचारी व अभ्यागत यांचेसाठी प्रसाधनगृहाची व्यवस्था

नगर पंचायत कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना व कर्मचारी यांचे करिता सोयी सुविधायुक्त महिला व पुरुष करिता स्वतंत्र प्रसाधन गृहाची व्यवस्था करण्यात आली आहे.



## इ ) महिला कर्मचारी व अभ्यागत यांचेसाठी स्वतंत्र स्वच्छ प्रसाधनगृहाची सुविधा

नगर पंचायत कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना व कर्मचारी यांचे करिता सोयी सुविधायुक्त महिला व पुरुष करिता स्वतंत्र प्रसाधन गृहाची व्यवस्था करण्यात आली आहे .






## ई) अभ्यागतासाठी सुसज्ज प्रतीक्षालय व्यवस्था

अभ्यागतासाठी सुसज्ज प्रतीक्षालय व्यवस्था करण्यात आली आहे.




# उ) कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक लावणे व कार्यालयाचे सौंदर्यीकरण

- कार्यालयात विभाग निहाय नाम फलक लावण्यात आले आहे.
- कार्यालयाचे सौदर्यीकरण करण्याचे अनुषंगाने फर्निचर, बैठक व्यवस्था, कार्यालय रंगरंगोटी, परिसर स्वच्छ करण्यात आले.












# ६. क्षेत्रीय कार्यालयांना भेटी

| अ. क्र. | निकष | |
|---|---|---|
| अ | आठवड्यातून किमान २ दिवस क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देऊन पाहणी करणे. | सदर बाब या कार्यालयास लागू नाही |
| आ | केंद आणि राज्य शासनाच्या महत्वाच्या कार्यक्रम / प्रकल्पांना भेटी देऊन अंमलबजावणी व पर्यवेक्षण करणे | केंद्र आणि राज्य शासनाच्या महत्वाच्या कार्यक्रम / प्रकल्पांना भेटी देण्यात येतात |
| इ | क्षेत्रीय भेटी दरम्यान ग्राम पंचायत, शाळा, अंगणवाडी व प्राथमिक आरोग्य केंद्र यांना भेटी देऊन कामकाजावर देखरेख ठेवणे. | सदर बाब या कार्यालयास लागू नाही |
| ई | ग्राम स्तरावरील कर्मचाऱ्याचे अनुभव, अडचणी व सूचना यांवर त्वरित कार्यवाही करणे. | |

# ७. ई-ऑफिस प्रणाली

| अ. क्र. | निकष | |
|---|---|---|
| अ. | प्रशासकीय कामकाजात ०१ जानेवारी २०२५ पासून ई – ऑफिस प्रणालीचा वापर करने | ई-ऑफिस प्रणालीबाबत सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे शासकीय ID तयार करण्याकरिता माहिती वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात आली आहे. |
| आ. | ई – ऑफिस प्रणालीत ४ किंवा त्यापेक्षा कमी स्तरावर मान्यता घेऊन प्रकरणाचा निपटारा करणे. | |

# ८. आर्थिक व औद्योगिक गुंतवणुकीस प्रोत्साहन

| अ. क्र. | निकष | |
|---|---|---|
| अ | गुंतवणुकदार उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे. | सदर बाब या कार्यालयास लागू नाही |
| आ | व्यापारी /कामगार वर्गाच्या संघटनाशी चर्चा करून त्यांच्या अडचणी सोडविणे. | |
| इ | गुंतवणूकदार उद्योजकांच्या अडचणीचे निराकरण करणे. | |
| ई | गुंतवणूकदार उद्योजकांसाठी कायदा व सुव्यवस्था प्रभावीपणे हाताळणे. | |

# ९. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI)

## अ) नव्याने सेवेत प्रविष्ट अधिकारी /कर्मचारी यांना प्रशिक्षित करणे

पाणी पुरवठा अभियंता व सहा. नगर रचनाकार यांचे प्रशिक्षण झालेले आहे.
व इतर नव्याने सेवेत रुजू झालेले अधिकारी/कर्मचारी यांचे नावे संचित पोर्टलव्दारे वरिष्ठ कार्यालयास प्रशिक्षनाकरीता सादर करण्यात आले .

## आ) पदोन्नत्या व कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचे निराकरण करणे

अद्याप या कार्यालयास एकही तक्रार प्राप्त नाही

## इ. कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञान वापरण्यासाठी अधिकारी /कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे

DSS WORLD software whatsapp द्वारे चाट बोट वापरा बाबत प्रशिक्षण देण्यात आले

## ई) कार्यालयातील कामकाज अचूक होण्यासाठी प्रत्यक्ष कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर सुरु करणे (AI)


DSS WORLD software whatsapp द्वारे चाट बोट वापरा बाबत प्रशिक्षण देण्यात आले.

# १०. कार्यालयामध्ये किमान २ नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे

## अ) शाळा सौंदर्यीकरण व भौतिक सुविधा उपक्रम

**पहिला टप्पा** – मा. जिल्हाधिकारी यांचे आदेशानुसार नगर पंचायतीच्या हद्दीमध्ये समाविष्ट असणाऱ्या आंगणवाड्या व जिल्हा परिषद शाळामधील मुलांची गैरसोय होऊ नये म्हणून सदर आंगणवाड्या व शाळांना पायाभूत सुविधा देण्याचे अनुषंगाने नगर पंचायत भिसी कडून पहिल्या टप्प्यात जिल्हा परिषद कन्या शाळा भिसी येथील अतिक्रमण काढण्यात आले आहे.

**दुसरा टप्पा** – नगर पंचायत भिसी कडून जिल्हा परिषद कन्या शाळा भिसी परिसरामध्ये सौंदर्यीकरन, संरक्षक भिंत, शौचालय व इतर आवश्यक भौतिक सुविधा करण्याकरिता प्रस्ताव तयार करून सादर करण्यात आला आहे.



## आ. कर वसुली उपक्रम

नागरिकांना मालमत्ता कर, पाणी कर Online प्रणालीद्वारे कोणत्याही ठिकाणावरून कोणत्याही वेळी कर भरण्याची सुविधा नगर पंचायत कार्यालयाकडून उपलब्ध करून देण्यात आली.

# धन्यवाद!